<u>नियमित फौजदारी खटला क्रमांक ३५८/२०२४</u>
<u>निशाणी क्रमांक :– १७</u>

# दोषारोप

**मी, आर. बी. राऊत, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कर्जत, (न्यायालय क्र. २) तुमच्यावर दोषारोप ठेवत आहे की,**

१. **पोपट बलभीम लोंढे**
वय– ५५ वर्षे, धंदा– शेती,

२. **मयुर पोपट लोंढे**
वय– २६ वर्षे, धंदा– शेती,

३. **अभिजित पोपट लोंढे**
वय– २१ वर्षे, धंदा– शेती,
सर्व रा. गुरवपिंप्री, ता. कर्जत, जि. अहमदनगर.

दि.०२/०४/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वाजताच्या सुमारास गुरवपिंप्री, ता. कर्जत, जि. अहमदनगर येथे फिर्यादीच्या घरासमोर फिर्यादीच्या पत्नीने तुम्हाला बचत गटाचा हप्ता जमा करण्यासाठी मागितला असता तुम्ही आरोपी क्र. १ ते ३ यांनी आपसात संगनमत करुन तुमचे सामाईक हेतुचे पुर्ततेसाठी फिर्यादीला हप्ता का मागता असे म्हणुन आरोपी क्र. १ याने फिर्यादीच्या पंक्चरच्या दुकानात असलेल्या लोखंडी गजाने फिर्यादीच्या डोक्यात, पाठीवर, डाव्या हातावर मारुन इच्छापुर्वक शारिरीक दुखापत केली व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ३२४ सहकलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणार असा अपराध केला आहे.

दुसरे– वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादीची पत्नी, भावजय हे भांडण सोडवण्यासाठी आले असता तुम्ही आरोपी क्र. १ ते ३ यांनी एकमेकांशी संगनमत करुन तुमचे सामाईक हेतूचे पूर्ततेसाठी फिर्यादीची पत्नी व भावजय यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ३२३ सहकलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणार असा अपराध केला आहे.

तिसरे– वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र. १ ते ३ यांनी एकमेकांशी संगनमत करुन तुमचे सामाईक हेतूचे पूर्ततेसाठी फिर्यादी, फिर्यादीची पत्नी व भावजय यांना शिवीगाळ करुन अपमानित केले जेणेकरुन त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग होईल अथवा अपराध घडेल असे जाणीपूर्वक कृत्य करुन तुम्ही भारतीय दंड विधान कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणार असा अपराध केला आहे.

चौथे– वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र. १ ते ३ यांनी एकमेकांशी संगनमत करुन तुमचे सामाईक हेतूचे पूर्ततेसाठी फिर्यादी, फिर्यादीची पत्नी व भावजय यांना 'परत आमचे नादी लागु नका नाही तर तुम्हाला एकएकाला जिवे ठार मारुन टाकीन' अशी धमकी देऊन फौजदारी पात्र धाकदपाटशा दाखविला व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ५०६ सहकलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणार असा अपराध केला आहे.

आणि मी याद्वारे असा निर्देश देतो की, उक्त दोषारोपाबद्दल तुमची या न्यायालयाद्वारे संपरीक्षा करण्यात यावी.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.10.29 17:28:32 +0530

दिनांक : २९.१०.२०२५ **(आर. बी. राऊत)**
ठिकाण : कर्जत न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.२
कर्जत

## <u>प्रमाणपत्र</u>

दोषारोप मधील मजकुर आरोपी यांना मराठीमध्ये वाचून व समजावून सांगितला. आरोपींचे निवेदन स्वतंत्रपणे नोंदविले आहे.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.10.29 17:28:37 +0530

दिनांक : २९.१०.२०२५ **(आर. बी. राऊत)**
ठिकाण : कर्जत न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.२
कर्जत